# दुपारचा विरंगुळा

छे! मला फारच उकडत होतं. आगदी काचेच्या ग्रीन-हाउस मध्ये बसल्या सारखे घामट झालं होतं. तिथल्या झाडांना असंच गरम आणि ओलसर वाटत असेल का?

छे! या विचारांचा काहीच उपयोग नव्हता. घरात गरम, बाहेर गरम. करायला काहीच नव्हतं. आगदी कंटाळा आला होता. घराच्या समोर जिन्यावर थोडीशी सावली आली होती. तिथेच मी बसले होते. पायरी सुद्धा अंगाला भाजत होती.

पापण्या बंद करून मी सूर्याकडे बघत होते. माझ्या बंद डोळ्यांसमोर रंगीत गोल, त्रिकोण तरंगत होते. वारा इतका संथ होता की झाडाची पाने सुद्धा हालत नव्हती.

“काय करायचं?” मी विचार करत होते. काहीतरी ठरवायलाच पाहिजे. घराची सावली त्या झाडापर्यंत जायच्या आत काहीतरी ठरवायचेच! ती सावली सुद्धा आगदी हळूहळू सरकत होती. उन्हामुळे सगळंच कसं संथ होतं.

तेवढ्यात मला अनिल दादाची खडूची पेटी दिसली. तो जिन्यावर ती विसरून गेला होता. एक पिवळा खडू घेऊन मी रस्त्यावर तळपता सूर्य रंगवला. त्याच्या बाजूला पांढऱ्या आणि पिवळ्या रंगाचे किरण रंगवले.

तेवढ्यात तिथे अनिल दादा आला. “काय करतीयेस रमा?” त्याने विचारले.

मी काहीच बोलले नाही. नुसतेच चित्राच्या खाली लिहिले - “उष्णता.”

अनिल दादानी त्याचा आवडता रंग घेतला - काळा. त्याने त्या काळ्या रंगाने एक मोठ्ठा चौकोन रंगवला.

“ते काय आहे?” मी विचारले.

“सावली.” दादा म्हणाला.

“दादा, नुसत्या काळ्या रंगाने काही…” मी बोलायला सुरुवात केली, पण थांबले. काही का असेना? उन्हाळ्यातल्या दुपारी काहीतरी विरंगुळा असला की बास!

~~~~~

१. खालील शब्द वापरून वाक्ये पूर्ण करा:

उष्णता, विरंगुळा, सावली, संथ, घामट, ओलसर, तळपत

झाडांना _____________ माती आवडते.

वारा इतका _____________ होता, की झाडाची पाने सुद्धा हालत नव्हती.

उन्हात खूप खेळल्यामुळे मी _____________ झालो होतो.

आरामात झोपून पुस्तक वाचणे हा माझा _____________ आहे.

घराची _____________ सरकत झाडापर्यंत पोहोचली.

दुपारी आकाशात सूर्य ___________ होता.

सूर्यापासून आपल्याला _____________ मिळते.

२. “चा, ची, चे” वापरून खालील नावे परत लिहा.

अनिल, रमा

_____________ खडू.

_____________ सूर्य.

३. रमा जिन्यावर बसली आहे, कारण…

_________________________________________________________________
~~~~~

४. रमाने तिच्या चित्राला “उष्णता” असे नाव दिले, कारण...

______________________________________________________________

५. तुम्हाला निवेदकाचे नाव पहिल्यांदा कधी कळले?

______________________________________________________________

६. खालील वाक्यांपुढे “सत्य” किंवा “काल्पनिक” असे लिहा.

सावलीचे चित्र काढून सावली तयार करता येते. ______________

उष्णतेचे चित्र काढता येते. ______________

आपण सूर्याचे चित्र काढू शकतो. ______________